रंग वारीचे.....
पांडुरंगकांती दिव्य तेज झळकती।
रत्नकीळ फाकती प्रभा॥
अगणित लावण्य तेज: पुंजाळले।
न वर्णवे तेथेची शोभा॥



ज्योतिर्मय
Online Journal of Literature....
साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १२९ वा ❑ गुरूवार दि.३ जुलै २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

## विशेष लेख...

# ई-मतदान: भारताच्या लोकशाही प्रक्रियेत एक नवा अध्याय सुरू

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

बिहार राज्य निवडणूक आयोगाने भारताच्या लोकशाही प्रक्रियेत एक नवा अध्याय सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, आयोगाने नगरपरिषद निवडणुकीत मोबाईल ॲपच्या माध्यमातून मतदान घडवून आणण्याची योजना आखली आहे. यामुळे बिहार देशातील पहिलं राज्य ठरणार आहे जिथे फोनवरून मतदान करता येणार आहे.

बिहारमध्ये लोकशाही मजबूत आणि तांत्रिकदृष्ट्या प्रगत करण्याच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल उचलण्यात आले आहे. बिहार हे देशातील पहिले राज्य बनले आहे जिथे मोबाईल फोनद्वारे ई-मतदान करण्यात आले. ही प्रणाली शनिवार, २८ जून रोजी होणाऱ्या महानगरपालिका जनरल आणि पोटनिवडणुका २०२५ मध्ये लागू करण्यात आली, ज्यामुळे मतदान प्रक्रिया अधिक स्मार्ट, सुरक्षित आणि सुलभ होईल.

बिहारने मोबाईल ॲपद्वारे मतदान करून भारतीय लोकशाहीत इतिहास रचला आहे. देशात पहिल्यांदाच बिहारमधील २६ जिल्ह्यांमधील ४२ नगरपालिकांच्या पोटनिवडणुकांमध्ये मोबाईल ॲपद्वारे मतदान घेण्यात आले. या पोटनिवडणुकीत, सहा नगरपालिकांमध्ये पायलट प्रोजेक्ट म्हणून मोबाईल एप द्वारे ई-व्होटिंग करण्यात आले.

बिहार राज्य निवडणूक आयोगाने ई-मतदान सुरू करून इतिहास रचला. पूर्व चंपारण येथील रहिवासी बिभा कुमारी यांनी मोबाईल फोन वापरून मतदान करून देशातील पहिली डिजिटल मतदार होण्याचा मान मिळवला. निवडणूक आयोगाने याला ''सुविधा, सुरक्षा आणि मजबूत सहभागाचे'' प्रतीक म्हटले.

**किती लोकांनी ई-मतदान केले?**

राज्य निवडणूक आयुक्त दीपक प्रसाद म्हणाले की, ई-मतदानासाठी पात्र असलेल्या ७०.२०% लोकांनी या सुविधेचा वापर केला, तर ५४.६३% मतदार पारंपारिक मतदान केंद्रांवर पोहोचले. एकूण ६२.४१% मतदान झाले, जे एक चांगले लक्षण आहे.

प्रसाद म्हणाले की, सहा नगरपंचायती आणि नगरपालिका पोटनिवडणुकांमध्ये सर्व ठिकाणी शांततेत निवडणुका पार पडल्या. सकाळी ७ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत एकूण ४८९ मतदान केंद्रांवर मतदान झाले, ज्यामध्ये ५३८ उमेदवार रिंगणात होते. ही प्रणाली पटना, बक्सर, भोजपूर, कैमूर, नालंदा, कटिहार, अररिया, सहरसा आणि पूर्व चंपारण यासारख्या पोटनिवडणुका सुरू असलेल्या जिल्ह्यांमध्ये लागू करण्यात आली. मतमोजणी ३० जून रोजी होईल.

**ही नवीन मतदान प्रणाली कोणासाठी बनवली आहे?**

प्रसाद म्हणाले की, ई-व्होटिंग सिस्टीम विशेषतः अशा लोकांसाठी तयार करण्यात आली आहे ज्यांना मतदान केंद्रांवर पोहोचण्यात अडचण येते जसे की वृद्ध, दिव्यांग, गर्भवती महिला आणि स्थलांतरित कामगार. ज्यांनी आधीच नोंदणी केली आहे त्यांनाच या सुविधेचा लाभ मिळेल.

**ई वोटिंग प्रणालीची वैशिष्ट्ये**

ही नवीन ई वोटिंग प्रणाली ब्लॉक चेन तंत्रज्ञान आणि चेहरा ओळख यासारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित आहे जी मतदान प्रक्रियेला पारदर्शी आणि सुरक्षित बनवते ही सुविधा प्रामुख्याने ज्येष्ठ नागरिक दिव्यांग व्यक्ती गर्भवती महिला आणि स्थलांतरित मतदार जे मतदान केंद्रापर्यंत पोहोचू शकत नाहीत यांच्यासाठी आहे मतदार मोबाईल ॲप किंवा राज्य निवडणूक आयोगाच्या वेबसाईट द्वारे मतदान करू शकतात. एका मोबाईल क्रमांकावरून जास्तीत जास्त दोन नोंदणीकृत मतदार लोगिन करू शकतात मतदान करण्यापूर्वी चेहरा स्कॅनिंग आणि मतदार ओळखपत्राची जुळवणी केली जाईल संपूर्ण मतदान प्रक्रिया ब्लॉग चेन तंत्रज्ञानाद्वारे सुरक्षित आणि हॅक प्रूफ बनवली गेली आहे.

# पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी ब्रिजमोहन पाटील

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे** – पुणे श्रमिक संघाच्या पत्रकार कार्यकारिणीची निवडणूक नुकतीच पार पडली. यामध्ये अध्यक्षपदी सकाळचे ब्रिजमोहन पाटील, उपाध्यक्षपदी महाराष्ट्र टाइम्सचे राजा गायकवाड आणि साम टीव्हीचे सागर आव्हाड यांची निवड झाली. खजिनदारपदी केसरीचे दिलीप तायडे, सरचिटणीसपदी दिव्यमराठीचे मंगेश फल्ले, चिटणीसपदी तनिष्का डोंगरे आणि नीलेश चौधरी यांची निवड झाली. यावर्षीच्या कार्यकारिणीमध्ये लक्ष्मण खोत, राजाराम पवार, दत्ता आढागळे, अतुल चिंचली, नरेंद्र साठे, आशिष देशमुख, समीर सय्यद, विक्रांत कुलकर्णी, तेजस टवलारकर, सज्जाद सय्यद यांची निवड झाली आहे.

# छत्रपती संभाजी नगर परिमंडळात महापारेषणचा वर्धापनदिन व पारितोषिक वितरण समारंभ जल्लोषात साजरा

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – महापारेषण कंपनीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक आदरणी श्री. संजीव कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली २७ जून २०२५ रोजी छत्रपती संभाजी नगर परिमंडळांत महापारेषण कंपनीचा २० वा वर्धापन दिन व पारितोषिक वितरण सोहळा डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ नाट्यगृहात मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला.

पारितोषिक वितरण करण्यासाठी उद्घाटक तथा प्रमुख अतिथी म्हणून श्रीमती सुचिता भिकाने कार्यकारी संचालक ( मानव व संसाधन ) महापारेषण मुंबई, ह्या प्रामुख्याने उपस्थित होत्या . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. नसीर कादरी, मुख्य अभियंता, छत्रपती संभाजी नगर परिमंडळ महापारेषण होते. या कार्यक्रमास मराठवाडयातील अधिकारी आणि कर्मचारी त्यांच्या परिवारासह मोठ्या संख्येने उपस्थित होते, कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. श्री. संजीव कुमार सुरडकर, अधीक्षक अभियंता ( प्रकल्प) यांनी केले. याप्रसंगी महापारेषण कंपनीमध्ये उपकेंद्र व वाहिनीत उत्कृष्ट कार्य करणा-या अधिकारी व कर्मचा-यासाठी पारितोषिक योजना सुरु करण्यामागचा हेतू व महापारेषण कंपनीतील कर्मचा-यांनी सन २०२४ -२५ या वर्षात केलेल्या उत्कृष्ट कामगिरी बद्दल माहिती दिली.

महाराष्ट्रातून राज्य स्तरावर विद्युत प्रणाली व प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, वाळुज, छत्रपती संभाजी नगर या प्रशिक्षण केंद्राने प्रथम क्रमांक पटकावला.छत्रपती संभाजीनगर परिमंडळातील २२० केव्ही नागेवाडी व १३२ केव्ही किल्लारी या उपकेंद्राला प्रथम, २२० केंव्ही पडेगाव व १३२ केव्ही बदनापूर या उपकेंद्राला द्वितीय पारितोषिक देण्यात आले. अउदा वाहिनी उपविभागामध्ये वाघाळा उपविभाग व धाराशिव-उपविभाग यांना



अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक. प्रकल्प विभाग छत्रपती संभाजी नगरला प्रथम, परभणी विभागाला द्वितीय, लातूर विभागाला तृतीय पारितोषिक मिळाले

बांधकाम विभागात लातूरला प्रथम व परभणीला द्वितीय पारितोषिक मिळाले. तसेच सर्वेक्षण व अन्वेषण विभाग छत्रपती संभाजी नगर विभागाला प्रथम पारितोषिक मिळालं. या कार्यक्रमादरम्यान मानव व संसाधन विभाग, वित्त व लेखा विभाग, माहिती व तंत्रज्ञान विभाग तसेच उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या समूहांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरवण्यात आले. या कार्यक्रमासाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सात्त्विक आहार, पर्यावरणाची जपणूक आणि देशी पर्यटनाची प्रेरणा एक मोलाचा सल्ला!''

कार्यक्रमास लाभलेल्या उद्घाटक तथा प्रमुख अतिथी मा.श्रीमती सुचिता भिकाने कार्यकारी संचालक(मानव संसाधन) यांनी आपल्या मनोगतात नमुद केले की, दैनंदिन जीवन जगताना प्रत्येकाने आपले आरोग्य टिकवण्यासाठी सात्विक आणि ऑरगॅनिक जीवनशैली अंगीकारली पाहिजे, असे त्यांनी आवर्जून नमूद केले. पिझ्झा, बर्गर यांसारखे कृत्रिम व बाहेरचे पदार्थ टाळून नैसर्गिक, शुद्ध आहार घेणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे, ऑक्सिजनचे महत्व जाणून,पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने वृक्षारोपणासारखे उपक्रम हाती घेतले पाहिजेत आणि वृक्षतोड थांबवण्याबाबत जागरूकता बाळगली पाहिजे. झाडांच्या अभावामुळे अनेक पशुपक्ष्यांना आपले निवासस्थान गमवावे लागते, त्यामुळे त्यांच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह उभे राहते.

तसेच पुढे त्या म्हणाल्या की सुट्टीसाठी विदेशी पर्यटनाचा मोह टाळून, आपल्या भारत देशातील विविध प्रांतांमध्ये, गावागावांत जाऊन तिथल्या लोकजीवनाचा, संस्कृतीचा आणि खाद्यपरंपरेचा अनुभव घ्यावा, अशीही त्यांनी मनापासून शिफारस केली. अशा प्रवासातून आपण आपल्या संस्कृतीशी अधिक घट्ट नातं निर्माण करू शकतो, स्थानिक लोकांना आर्थिक आधार मिळतो आणि आपणही 'भारत' देशाला नव्या दृष्टिकोनातून पाहू शकतो. अशाप्रकारे आरोग्य, पर्यावरण आणि संस्कृती यांचा सुंदर समन्वय साधणारा असा दूरदृष्टीपूर्ण, प्रेरणादायी आणि समाजशील विचारांचा मोलाचा सल्ला त्यांनी उपस्थितांना दिला.

तसेच उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल बक्षीस मिळालेल्या सर्व चमुचे हार्दिक स्वागत केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या

**महावितरण, महापारेषण, आणि महाजनरेशन:**

एकतेचा वर्धापन दिन छत्रपती संभाजी नगर महावितरणचे मुख्य अभियंता मा. श्री. कछोट यांनी नुकत्याच साजरा झालेल्या महापारेषांच्या वर्धापन दिनानिमित्त एक महत्त्वपूर्ण विधान केले. ''महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती हे आपण सर्व एकच आहोत आणि आपल्या सर्वांचाच हा वर्धापन दिन आहे,'' असे ते म्हणाले.

श्री. कछोट यांनी या प्रसंगी सांगितले की, महापारेषणद्वारे सध्या नेटवर्कचे जाळे मजबुतीकरण करणारे अनेक प्रकल्प राबवले जात आहेत. या प्रकल्पांचा महावितरणला मोठ्या प्रमाणावर फायदा होत आहे. याच एकत्रित प्रयत्नांमुळे आम्ही ग्राहकांना सुरळीत आणि अखंडित वीज पुरवठा उपलब्ध करून देऊ शकतो, असेही त्यांनी स्पष्ट केले.

छत्रपती संभाजी नगर परिमंडळाचे मुख्य अभियंता, श्री. नसीर कादरी यांनी कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप केला. वर्धापन दिन आणि बक्षीस वितरण समारंभाच्या निमित्ताने आयोजित रक्तदान शिबिरामुळे मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांमध्ये एकाच दिवशी रक्तदान मोहीम राबवण्यात आली. या उपक्रमात सुमारे २५९ जणांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

यासोबतच, पर्यावरणपूरक वृक्षारोपण कार्यक्रमही यशस्वीरित्या राबवण्यात आला. छत्रपती संभाजीनगर महापारेषण परिमंडळात एकूण २००१ वृक्षांची लागवड करण्यात आली. यामध्ये, विशेषतः ७६५ केव्ही एकात्मिक ऊर्जा प्रकल्पांतर्गत ५०० झाडे लावण्यात आली, जो एक अत्यंत स्तुत्य आणि मोठा उपक्रम ठरला.

या दोन्ही समाजोपयोगी कार्यक्रमांमध्ये अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी दिलेल्या उत्स्फूर्त सहभागाबद्दल श्री. कादरी यांनी सर्वांचे अभिनंदन केले. तसेच, पारितोषिक विजेत्यांचेही अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या वर्षात ९९.७८% उपलब्धता () साध्य केल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले आणि कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. याशिवाय, यावर्षी कंपनीला भंगार विक्रीतून १० कोटी रुपयांचा विक्रमी फायदा झाल्याचे त्यांनी नमूद केले. याबद्दल त्यांनी येथील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे विशेष अभिनंदन केले.

भविष्यातही असेच उत्कृष्ट काम करण्याची प्रेरणा त्यांनी यावेळी दिली.

सदरील कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन दिप्ती भागवत व सौ. स्वप्ना मदनीकर यांनी केले.

कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी अधीक्षक अभियंता संजीव कुमार सुरडकर, संजीव कांबळे,रंगनाथ चव्हाण, अंजना ठक्कर, जाधववर तसेच सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) श्रीमती मंजुषा दुसाने,श्री. प्रविण यशवंते, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले)सर्व कार्यकारी अभियंता, व्यवस्थापक (मासं), (विवले) यांच्यासह आयोजन समितीच्या सर्वच सदस्यांनी परिश्रम घेतले.

# पंढरीचा राणा उभा भक्त काजा ॥ उभारोनी भुजा वाट पाहे

ज्योतिर्मय साहित्य

रामरावांच्या घरी वारीची परंपरा. पिढीजात आलेल्या खड्या, गोड आवाजात सुंदर अभंगानी पूर्ण वातावरण कसं भक्तीमय करणारे रामराव निस्सीम विठ्ठलभक्त.... लहानपणापासून रामराव त्यांच्या आजोबा, नंतर वडीलांबरोबर... नित्यनेमाने वारी करीत.

आता मात्र वयोपरत्वे वारी होईनाशी झाली. काय करावे ? कसं करायचं ? कोण आपल्याला नेणार ? माझ्यानंतर कोण वारी पोहोचवणार, त्यांचा मुलगा शिकून मोठा झाला आणि परदेशी स्थिरावला होता... वारी कशी पोहचावावी?

बायको पण आता थकली... मला कोणीच मदतीला नाही. वारीसाठी कोण मदत करेल. त्यांच्या मनातून, डोक्यातून वारी हा विषय जात नव्हता. मनातल्या मनात अखंड धारा बरसत होत्या. काहीच इलाज सापडत नव्हता.

ज्येष्ठ महिना संपत आला...आषाढ शुद्ध प्रतिपदा आली तरी काहीच मार्ग सापडत नव्हता... नशिबाला आणि शरिराला दोष देण्या व्यतिरिक्त काहीच करु शकत नव्हते... विचार करून डोकं, मन दोन्ही देखिल शिणले... डोळा लागला... स्वप्नात मायबाप पांडुरंग रखुमाई मंदिर दिसू लागले... वारीची गजबज, प्रदक्षिणा मार्ग विठू माऊलीच्या नामघोषाने न्हाऊन निघाला... भक्तीचा महासागर लोटला होता. अष्टगंध बुक्याचा, तुळशीफुलांचा घमघमीत



वास सगळीकडे दरवळत होता...

गर्दीच्या महापूरातुन वाट काढीत रामराव देवळात पोहचले...

आलास का रामा मी तुझीच वाट पाहत होतो... तुझ्यासाठी ही विणा आणि तुळशीची माळ तुला देण्यासाठी तुझी वाट पाहत होतो...

मला माहीती होतं... तुला यंदा पासून वारीला यायला जमणार नाही ते.... अरे रडू नकोस! मीच येतो तुझ्याकडे पुढिल वर्षी... तोपर्यंत ही ठेव तुझ्याकडे असू दे ! रामराव डोळेभरून देवाकडे पाहत होते... देवानं विणा आणि तुळशीची माळ हातात ठेवली... तेवढ्यात ''रामराव ओ रामराव,!! अहो, अहो उठा उठा !'' अश्या हाका कानावर ऐकू येत होत्या... रामराव उठले... जानकी बाई सांगत होत्या पलिकडच्या गल्लीतला विठ्ठल आला आहे त्यांने पंढरपूरचा प्रसाद म्हणून तुमच्यासाठी विणा आणि तुळशीची माळ आणली आहे... विठ्ठलने त्यांच्या हातात विणा आणि तुळशीची माळ ठेवली तेव्हा रामराव त्याच्याकडं बघतच राहिले...

तेच रुप... तोच जगदिश्वर, परमात्मा... मायबाप... साक्षात... पांडुरंग... उभा राहिला... आणि म्हणत होता आजोबा पुढच्या वर्षी तुमच्यासाठी पांडूरंग रखुमाईची मोठी मुर्ती घेऊन येतो बर का....




पण त्या बदल्यात तुम्ही मला अभंग म्हणायला शिकवाल का ?... रामरावांनी मान डोलावली नकळत दोन्ही हात जोडून.... आणि

''पंढरीचा राणा उभा भक्त काजा ॥ उभारोनी भुजा वाट पाहे'' हा अभंग म्हणायला सुरुवात केली......

॥ रामकृष्ण हरि॥




# कालिदासाचे मेघदूत : भारतीय संस्कृतीचा लेखाजोगा साहित्य भारती च्या कार्यक्रमात डा. निलंगेकर यांचे मत

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – महाकवी कालिदासाची मेघदूत रचना म्हणजे भारतीय संस्कृती, विज्ञानापर्यंतचा लेखाजोगा, ठेवा आहे असे मत संस्कृत लेखक डा. अजय निलंगेकर यांनी व्यक्त केले. साहित्य भारती च्या वतीने शनिवारी (दि. २८) आयोजित कालिदास दिन कार्यक्रमात ते बोलत होते.

नारायणराव उजळंबकर वाचनालयात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स.भु. विज्ञान महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. संजय गायकवाड होते. व्यासपीठावर प्रा. डा. वि. ल. धारुरकर, साहित्य भारतीचे प्रांत कार्याध्यक्ष उमेश काळे यांची उपस्थिती होती.

आपल्या संस्कृतीला धक्का न लावता कालिदासाने लेखन केल्याचे सांगत निलंगेकर म्हणाले की, मेघदुतात रामगिरी पर्वतापासून ते हिमालयापर्यंत वर्णन आहे. हे वर्णन आजच्या काळातही तंतोतंत लागू पडते. भूगोल,इतिहास,धर्म,तत्कालिन समाजजीवन याचा उलगडा काव्यातून होतो. या काव्यात मेघाच्या साठ रुपांचे वर्णन असून लेखनशैली, अर्थ सर्वांना समजण्यासारखा असल्याचे त्यांनी सांगितले. प्रा. धारुरकर यांनी कालिदासाच्या प्रतिभेचा आढावा घेत काव्य सादर केले. साहित्य भारतीच्या वतीने राबवत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती प्रास्ताविकात काळे यांनी दिली.

सूत्रसंचालन डा. नागेश अंकुश यांनी तर आभार विलास फुटाणे यांनी मानले. यावेळी प्रा. अंकुश यांच्या अक्षरमात्र तितुकें नीट या पुस्तकाची कर्नाटकातील राणी चन्नमा विद्यापीठ अभ्यासक्रमात निवड झाल्याबद्दल, त्यांचा पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दीपाली कुलकर्णी, संगीता धारुरकर, योगीता देवागिरीकर, शेषराव पठाडे, अनघा देवगिरीकर, विजय जोग, विनायक पवार, ग्रंथालयाचे कर्मचारी उदय सुरंगळीकर आदींनी प्रयत्न केले.




## जात्यावरच्या ओव्या......

जावई राजसी
मोटार रस्त्यावर उभी
राजस बाई मही
नांदायला गेली बिबी ||१५०||

गाडी माग गाडी
एका गाडी अंतरली
राजस बाई माझी
भेटीसाठी उतरली ||१५१||

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर


## अंधारापलीकडील प्रकाश हेलन केलर यांची प्रेरणादायी गाथा




ज्योतिर्मय साहित्य

अॅनी सुलिव्हन यांनी केवळ अक्षरेच शिकवली नाहीत, तर हेलनच्या आत्मविश्वासाला पंख दिले. तिच्या बोटांनी ती वाचू लागली, ओठांवरील हालचाली हाताने समजून शब्द तयार करू लागली. आज आपण कल्पना करू शकतो का एखादी मुलगी जी ना ऐकू शकते, ना पाहू शकते, ना बोलू शकते, ती बोलू लागते, लिहू लागते, जग बदलू लागते ?


पुढच्या काही महिन्यांत तिच्या डोळ्यांऐवजी तिच्या बोटांनी वाचायला सुरुवात केली. ती अंध, मूक, बहिरी होती पण बुद्धिहीन नव्हती. तिच्या शिकण्याचा वेग उत्तम होता. तिच्याजवळ दृष्टी नसली तरी भावी आयुष्याचं स्वप्न होतं. तिचं आत्मचरित्र वाचलं की, आपण परिस्थितीसमोर किती खचून जातो किंवा तिच्यापासून घाबरून किती दूर पळतो याची जाणीव होते.




हेलनच्या जागी दुसरी एखादी मुलगी असती तर ? जरा कल्पना करून पहा. ती खचली असती, कोलमडली असती. पण हेलन अशासाठी जन्मालाच आलेली नव्हती. तिचे जग अंधाराच्या गर्तेत बुडालं होतं हे खरं... पण ही मुलगी तशी तिथे थांबणारी नव्हती. तिचे डोळे जातात खरे; पण तिच्या आतले डोळे जागृत होतात. खरं तर तिच्याकडे काय असतं?असते तीव्र स्पर्श संवेदना! त्या जोरावरच आपल्या आईवडिलांच्या, मिस फुलर, अॅन सॅलिव्हन यांच्या साहाय्याने ती शब्दांचा शोध घेते. या शोधात तिला सापडतात तिचे स्वत:चे शब्द, तिची वाट...त्यामुळे हे चरित्र प्रेरणादायी ठरते. जीवनाला टाळता येत नाही हे हेलनला पक्के ठाऊक होते. मग आयुष्याला सामोरे जायचेच आहे तर सर्जकतेने व न थकता का जाऊ नये, असा विचार तिने केला. त्यातूनच तिला तिच्या जीवनाचा मार्ग सापडला.

याचा अर्थ असा नव्हे की, तिच्यासाठी अपंगत्व स्वीकारणे खूप सोपे होते. सुरुवातीला तिला फार त्रास झाला; पण तिला कळले की, आपल्या स्पर्श संवेदना तीव्र आहेत. नुसत्या हवेच्या वासावरून ती पाऊस किंवा वादळ येईल, असे भाकीत करू शकायची. याचा वापर करून ती अनेक गोष्टी शिकली. ओठांवर हात ठेवून त्यांची होणारी हालचाल, गळ्याच्या स्नायूंची होणारी हालचाल यांना स्पर्शाच्या साहाय्याने जाणून घेऊन त्याद्वारे शब्दसृष्टीत प्रवेश करणारी ही एकमेवाद्वितीय मुलगी होती. ती शिकत गेली. तिचा उत्साह वाढत गेला. आपण कल्पना करू शकतो की आपल्यासारख्या चांगली दृष्टी असणाऱ्या व्यक्तींना देखील शिक्षणात आणि जीवनात किती अडचणींचा आणि अडथळ्यांचा सामना करावा लागतो. हेलनचं कसं झालं असेल ? सोपं असेल का तिच्यासाठी हे सगळं शिकणं ? पण प्रयत्ने वाळूचे कण रगडीता तेलही गळे ही म्हण तिने सार्थ करून दाखवली.

(क्रमशः)







उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## सख्यभक्ति

ज्योतिर्मय साहित्य

नमस्कार मंडळी आपण सख्यभक्तिचा थोडक्यात अभ्यास केला आता आपण सख्यभक्तिचे ओवीनुसार विवेचन करूया.

मंडळी समर्थानी एकुण बत्तीस ओव्यामध्ये याचे वदशर्णन केले आहे ते कसे . तर समर्थ सख्यभक्तिची व्याख्या किती थोडक्यात करतात पहा हं! भगवंताला प्रेमाने वश करण्यास त्याला आवडेल असे वागणे म्हणजे सख्यभक्ति होय. किती साधी सोप्पी सुटसुटीत व्याख्या आहे ना! सख्य सर्वाशी असावे. कारण वैर भाव असु नये ही तर भारतीय संस्कृती ची शिकवण आहे. समर्थानी सख्यभक्ति कशी असावी ह्याचे अगदी साधे वर्णन समर्थ करतात. कसे ते आता पाहूया. देवाचे जे सद्गुण आहेत ते आपल्यात यावेत असे आपले वर्तन असावे. देशाशी आपले पणाने बांधून ठेवावे. भगवंताला जे आवडते तसे आचरण ठेवावे. भक्ति, भाव, भजन, निरूपण, कथाकिर्तन, प्रेमळ भक्तिगायन, भगवंताशी एकरूप व्हावे ते कसे १)अनुराग /भगवंताच्या अस्तित्वाबद्दल अत्यंत नि:संदेह बनणे म्हणजे भाव होय. जी वस्तु खरी आहे ती आपल्या जवळ असावीशी वाटते. याला आवड किंवा राग म्हणतात. हा राग स्थिर झाला की माणसाच्या मनात अनुराग निर्माण होतो. ती वस्तु प्रिय बनते. ती मिळाल्या खेरीज चैन पडत नाही. मिळवण्यासाठी मार्ग शोधायला लागतो. ईश्वराशी तादात्म पावतो. याचे नाव अनुराग. भाव म्हणजे मिटलेले कमळ, तर अनुराग म्हणजे संपूर्ण ऊमललेलें कमळ समजावे. सततच्या भगवंत भक्तिने म्हणजे माळ घेऊन जपकरणे, भजन, पुजन स्तोत्र पठन, पोथी वाचन करणे पदे गाणे त्याची सेवा करणे. त्याच्या सगुण व निर्गुण रूपाची बुद्धिप्रधान चर्चा करणे. विवेचन, निरूपण करणे. यासंदर्भात मला एक सांगावेसे वाटते की भक्ताच्या ह्दयात भगवंता बदूल प्रेम निर्माण झाले की देवाशी सख्य निर्माण होते आणि समर्थानी हे आपल्याला सांगितले आहे. सततच्या भगवंत भक्तिने तो देवाभोवती केंद्रित होतो बाकी ऐहीक गोष्टीचा विसर पडतो. देव म्हणजे प्राण समजावा. **(क्रमशः)**



## भगवंताचे अनुसंधान राखावे.

श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

फार दिवस वापरून जोडा फाटला की तो दुरुस्त केला तरी पुन: पुन: फाटतोच. तसेच शरीराचे आहे. शरीर जीर्ण झाल्यावर त्याला काही ना काही तरी होतच राहते. दुरुस्त केलेल्या जोड्यातला एखादा खिळा जर पायाला टोचू लागला तर मात्र त्याला जपावे लागते. तसे, आजारपणामुळे मनाला टोचणी लागली तर जपावे आणि त्याचा मनावर परिणाम होऊ देऊ नये. आपल्या आजाराचा, म्हातारपणाचा आपण फायदा करून घ्यावा. एखादी शहाणी सुगरण बाई ज्याप्रमाणे कोंड्याचा मांडा करते, त्याप्रमाणे आपण आपल्या दुखण्यामधून भगवंताचे अनुसंधान टिकवायला शिकले पाहिजे. अनुसंधानात असले की प्रपंचात मजा आहे; अडचणी आणि संकटे यांचीसुद्धा मजा वाटेल. पोहायला येणाऱ्या एखाद्याला नुसते सरळ पोहायला सांगितले तर आवडणार नाही. तो उड्या मारील, बुड्या मारील, वाकडातिकडा पोहेल; तसे, भगवंताच्या अनुसंधानात राहिले तर प्रपंचाची मजा वाटेल.

कोणतीही गोष्ट एकदा ओळखली की मग तिची नाही भीती वाटत. विषय जोवर ओळखले नाहीत तोवरच ते आपल्याला त्रास देतात. याकरिता, ज्या ज्या गोष्टी होत असतात, त्या त्या भगवंताच्या इच्छेनेच होत आहेत, ही जाणीव ठेवून वृत्ती आवरण्याचा प्रयत्न करावा. परमार्थाच्या आड आपले आपणच येत असतो. आपली वृत्ती जिथे जिथे वावरते तिथे तिथे भगवंताची वस्ती असते. म्हणून वृत्ती जरी कोणतीही उठली तरी तिथे भगवंताची आठवण केली तर ती चटकन् मावळते. आपण नेहमी आपल्या उपास्य देवतेचे स्मरण करीत असावे. त्याच्या पायावर मस्तक ठेवावे, आणि त्याची अनन्य भावाने प्रार्थना करावी की, “ हे भगवंता, तुझ्या आड येणारे हे विषय तुझ्या कृपेशिवाय नाही दूर होणार. आजवर जगाचा मी अनुभव पाहून घेतला. तुझ्या प्राप्तीशिवाय कशातही सुख नाही असे भासू लागले, तरी वृत्ती आड आल्याशिवाय रहात नाही. माझ्या अज्ञानाने मी आज स्वत:च्याच आड येत आहे. तरी तुझी, म्हणजे पर्यायाने माझीच, ओळख मला पटावी, आणि त्यात मी तुला पाहावे, हीच माझ्या जीवितातली शेवटची इच्छा आहे. ही इच्छा तुझ्या कृपेशिवाय पूर्ण होणे शक्य नाही. तरी, हे भगवंता, माझे मन तुझ्या चरणी राहो असे कर. यापेक्षा मला जगात दुसरे काहीही नको. आता मी तुझा झालो. यापुढे जे काही होईल ती तुझीच इच्छा मानून मी राहीन, आणि तुझे नाम घेण्याचा आटोकाट प्रयत्न करीन. तू मला आपला म्हण.”

वृत्ती स्थिर झाली की त्याच्या मागोमाग समाधान येतेच.

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

## संत जनाबाई यांचा अभंग

ज्योतिर्मय साहित्य

उदासीना चा देह ब्रह्मरूप
नाही पुण्य पाप लागत त्या
अनुताप अंगी अग्नीच्या ज्वाला
नाही मृगजळा विझो येत
दोष ऐशा नावे देहाचा आदर
विटाळले अंतर अहंभावे
तुका म्हणे जाय नासोनिया खंती तिची हे चित्ती बद्धता ते
– जगद्गुरु तुकाराम महाराज

नाठवे आशा देहा वरी उदास
मी तू पण भाष चोजवेना
रखुमादेवीवर विठ्ठल मुरोनी राहिला
तो आनंदू देखील संत जनी
– संत ज्ञानेश्वर

देता काहीची न घेती संत उदासीन चित्ती त्रैलोकीचा मानधन नावडे तया देवा विण नाही आस्था देहावरी आशा तृष्णा कैची उरी निळा म्हणे ते देवची झाले कल्प कल्पांती संचले
– संत निळोबाराय

देहातीत होणे किंवा विदेही होणे हे किती दुरापास्त आहे असे होण्यासाठी अहंकार हा पूर्णपणे लीन व्हावा लागतो. अहंकार म्हणजे देह भावनेची जाणीव. हा अहंकार लीन होणे यासाठी शरीरात प्रचंड योगाग्णी निर्माण व्हावा लागतो आणि हा योगाग्नी निर्माण होण्यासाठी प्रथम प्राण व्हा उर्ध्वरेता व्हायला हवा. तो सुशुमने द्वारे सहस्त्रार कडे अग्नी स्वरूप होऊन वर सरकायला हवा. शरीरात प्रचंड योगाग्नी असेल, शरीर हे जणू धगधगते अग्नीकुंडच झाले असेल, तेव्हाच देह भावना संपते अहंकार लीन होतो. पाप पुण्यांची बीजे या अग्नीत जळून भस्मसात होतात. सूक्ष्म स्तरावर दडलेले वासनेचे बीज समूळ नष्ट होते. तेव्हाच अहंकार लीन होतो. व माणूस उदासीन होतो, वा विदेही होतो. हे अतिशय कठीण असे कर्म आहे. संत जनाबाई आपणास मी विदेही झाले असे म्हणतात. पण त्यापूर्वी त्यांची साधना काय स्तरावरून त्यांनी पूर्ण केली हे आपण ध्यानी घ्यायला हवे. तरच विदेही होणे हे किती दुरापास्त आहे आणि अशा विदेही होण्यामुळे ब्रह्मरूपता येणे हे कसे घडते हे आपण समजून घ्यायला हवे.

ज्यावेळेस प्राण हा उर्ध्वरेता होतो. मन हे बुद्धीत विरल्या जाते. बुद्धी कुंठीत होते व विषयापासून परावृत्त होऊन ती केवळ आत्म्याकडे दृढतेने वळते. यावेळेसच मनातील मी तू पण संपल्या जाते. देह भावना संपुष्टात येते. विकारांचे मळभ नष्ट होऊन आत्म्याचा दिव्य प्रकाश तेजोमय रीतीने बुद्धीवर पडतो. आणि याच वेळेस परमानंदाची प्राप्ती होते. या स्थितीचे वर्णन ज्ञानेश्वरीत असे आले आहे

जो आत्मयोगे अथिला जो कर्म फळाची विटला तो घर रिघोनी वरीला शांती जगी
ज्ञानेश्वरी ५/७१

ज्याची बुद्धी निष्ठेने दृढतेने आत्म्याशी जोडली गेली आहे, असा आत्म योगी कर्म फळास आपोआप विटला जातो. त्याचे प्राण मन बुद्धीत स्थिरावले व बुद्धी आत्म्यात तेथे त्याला शांतीचा वारा झोंबला घट्ट प्रेम जडले असे होते.

मनात शांती भाव कसा येतो यासाठी वरील ओवीचा शब्द न शब्द ह्दयात बिंबवायला हवा. तेव्हाच ती स्थिती किती दुर्मिळ आहे हे आपल्या ध्यानी येईल. मूळ नेले हे क्रोधाचे ठाणे केले विवेकाचे आपल्या मनात, आपल्या शरीरातील पेशींच्या जीन्स पर्यंत, काम, क्रोध मद, मत्सर, दंभ व लोभ यांची बीजे दडलेली असतात. **(क्रमशः)**



## ॥ निरूपण ॥

ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**जगदम्ब नमस्तुभ्यं स्मितहासविलासिनि।**
**भक्तानां हर्षसन्तोषमोदकारिणि वत्सले ।। १६ ।।**

हे स्मितहासविलासिनी,जगदंबिके, तुला नमस्कार असो. भक्तांना हर्ष, संतोष आणि मोद करणारे, वत्सले तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं काञ्चनवृष्टिहेतवे।**
**जगदम्ब नमस्तुभ्यमाह्लादिनि नमो नमः।। १७ ।।**

सुवर्णवृष्टीसाठी, जगदंबे, तुला नमस्कार असो. आह्लादिनी, अशा जगदंबे तुला त्रिवार नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं देवि दानवनाशिनि।**
**नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं भक्तरक्षणहेतवे।। १८ ।।**

दानवांचा नाश करणारे, देवी, जगदंबे, तुला नमस्कार असो. भक्तरक्षणासाठीतुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं कोटिचन्द्रप्रभे नमः।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं कोटिसूर्यप्रभे नमः।। १९ ।।**

कोटीचंद्राप्रमाणे, प्रभा असणारे, जगदंबिके, तुला नमस्कार असो. कोटीसूर्याप्रमाणे प्रभा असणारे, जगदंबिके, तुला नमस्कार असो.




## गॅसेस का होतात ?

ज्योतिर्मय साहित्य

खूप लोकांना गॅसेसचा त्रास होतो. म्हातारपणात तर बऱ्याच लोकांमध्ये हा त्रास आढळून येतो. लहान मुलांमध्येही गॅसेस होऊ शकतात. गॅसेस किंवा वायूविकाराचे मुख्य कारण म्हणजे आपल्याला माहित नसताना हवा गिळण्याची सवय.

खूप बोलणाऱ्या लोकांमध्ये (उदा. शिक्षक, राजकीय नेते) अशा प्रकारे जास्त हवा गिळली जाते आणि गॅसेसचा त्रास होतो. लहान मुलेही दूध पिताना हवा गिळतात आणि त्यामुळे गॅसेस होऊन त्यांचे पोट दुखायला लागते.

मोठ्या आतड्यात सुक्ष्म जंतूंची अन्नावर क्रिया होऊनही वायू निर्माण होतो. याखेरीज शौचास साफ न झाल्यास किंवा बद्धकोष्ठाचा त्रास असल्यास मल शरीरात साचून राहतो व या मलाचे विघटन होऊनही वायू तयार होतात. वायू तयार झाल्यावर तो आतड्याच्या भिंतीवर ताण आणतो. त्यामुळे पोट दुखते. डोकेही दुखते.

गॅसेसचा त्रास होऊ नये यासाठी जेवणाच्या वेळा नियमित असाव्यात. थोडीशी भूक ठेवूनच जेवावे. हरभऱ्याच्या डाळीचे किंवा तेलकट पदार्थ कमी खावेत. बैठे काम करणाऱ्यांनी भरपूर व्यायाम करावा. सर्वांनीच निदान जास्तीत जास्त



पायी चालण्याचा प्रयत्न करावा.

पवनमुक्तासन सारख्या आसनांमुळे गॅसेस बाहेर पडतात. अनावश्यक बडबड टाळावी. हिंग्वाष्टक चूर्ण घेतल्यास गॅसेसवर चांगला उपचार होतो. बैठे काम करणाऱ्यांनी जेवणानंतर दीड दोन तासांनी ताठ बसून बेबी आत ओढून पाच ते पंधरा सेकंद तशीच ठेवण्याचा प्रयत्न करावा. असा उपाय वारंवार केल्याने गॅसेसचा त्रास नक्कीच कमी होतो.

चार चौघे जमल्यावर आपल्याला लाज आणणारा हा वायूविकार आहाराच्या सुयोग्य सवयी आणि व्यायाम यामुळे आपण आटोक्यात आणू शकतो.

***

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९




ज्योतिर्मय साहित्य


रामास दशरथाने पुन्हा बोलाविले राम आपल्या महालातून तिथे येई तोवर प्रजा रामाचा जयजयकार करीत होती.दशरथ म्हणे मला कांहीं स्वप्न पडले.मला जाणकार म्हणाले एक तर अयोध्येवर मोठे संकट येणार नाहीतर दशरथ मृत्युमुखी पडेल.मला चिंता झाली आहे.माझ्या अंतःकरणात जगण्यासाठी फार अपेक्षा उरल्या नाहीत पण एकच इच्छा आहे.मरण्यापूर्वी तुला राज्याभिषेक झालेला पहायचे आहे.माझी बुद्धी पुन्हा बदलू शकते.



कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

भरताला अश्व पती कडे पाठवून त्याची अडचण जरा शिथिल केली होती.वसिष्ठानी रामास कांहीं व्रते करण्यास सांगितले.प्रजा उत्सव साजरा करायला लागली.वाद्ये वाजू लागली.राजवाडे बाहेर लोक जमू लागले.ही गर्दी का असे वाटून कैकयी गच्चीवर गेली

कैकयीस अजून राम गादीवर बसणार हे माहितीच नाही. कौसल्येचा दासिना हे माहीत होते.

परमात्मा प्रभू रामचंद्र हे राज्यात राज्याभिषेक करून घेणार राजा होणार हे ऐकून देव मुनी पण चिंतेत होते कारण हा इथे राजा होऊन बसला तर रावणाला कोण मारील? भगवान अवताराला का येतात तर १ दुष्टांचे निर्दालन व २ सज्जनांचे प्रतिपालन ही असतात. सर्व देव ब्रम्ह देव कडे गेले.ते म्हणाले अहो हा प्रभू राज्यावर बसला तर रावणाचे निर्दालन कोण करील? हा ताप कोण कमी करील? ब्रम्ह देवांना कांहीं सुचेना. आता काय करावे? तू सुचव असे त्यांनी सरस्वतीस विचरले. सरस्वती ने मंथ रा चे डोके बिघडवले. **(क्रमशः)**



विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

### भारतीय संस्कृतीचे प्रतिनिधी रवींद्रनाथ

जपानमध्ये तीन महिने त्यांचे वास्तव्य होते तेथील त्यांच्या वास्तव्यात जपान मधील ग्रामीण भागातील लोकजीवन त्यांनी जवळून पाहिले. जपानमधील निसर्गसौंदर्य त्यांना खूप आवडले. जपान म्हणजे पर्वतांच्या रांगा, झुळझुळणारे झरे, विस्तीर्ण किनाऱ्यावर आदळणाऱ्या समुद्राच्या लाटा आणि संरक्षण करण्यासाठी उभा ठाकलेला आणि बर्फाची टोपी परिधान केलेला फुजियामा पर्वत ! त्यांना असे आढळले की जपानी लोकांजवळ मोठ्या प्रमाणावर सौंदर्यदृष्टी आहे आणि तेथील अगदी गरीबातील गरीब माणूस ज्याला दोन वेळेचे पुरेसे अन्न सुद्धा मिळत नाही असा माणूस सुद्धा एका पेनीची फुले विकत घेतो. त्याच्या दृष्टीची आणि सौंदर्याची भूक त्याच्या पोटाच्या भुकेपेक्षा काकणभर देखील कमी नाही. जपानमध्ये अनेक ठिकाणी सादर करण्यात आलेले नृत्य पाहून रवींद्रनाथ भारावून गेले. त्यांच्या नृत्यात त्यांना विनय आढळला. कारण ते ( जपानी लोक ) फक्त सौंदर्यदृष्टीने त्याकडे बघत होते.

रवींद्रनाथ त्यांच्या नृत्याबद्दल बोलताना म्हणतात,'' एक दिवस मी जपानी नृत्याचा कार्यक्रम पाहायला गेलो, तेव्हा मला असं दिसलं की हे नृत्य म्हणजे अंगप्रत्यंगाच्या हालचालीचे संगीत आहे. आपल्या देशातील वीणेवर छेडल्या जाणाऱ्या संगीताशी याची तुलना होऊ शकते. दोन भागात हे सादर करीत असतानाही मध्ये थांबत नाही. वेगवेगळ्या टप्प्यात अंतर भासत नाही. अगर दोन भाग सांधत असताना जाणवत देखील नाही. पूर्ण अंग चढत जाणाऱ्या वेलीसारखं उंचावतं आणि जणू सौंदर्य फुलांची उधळण करतं. जपानी नृत्य हे शुद्ध नृत्य आहे. या नृत्याच्या पोशाखात थोडेही अंग उघडे पडण्यास वाव नाही. इतर देशातील नृत्यात अंगप्रत्यंगाच्या हालचाली बरोबर कामुक हावभावांचे देखील मिश्रण असते. ह्या नृत्यात मात्र अशा भावना सुचित सुद्धा होत नाहीत.''

त्यानंतर मेजर पाँड यांच्या आमंत्रणावरून ते अमेरिकेला गेले. तेथे अनेक ठिकाणी त्यांची व्याख्याने झाली. तिथे त्यांच्या शांतीनिकेतनच्या शाळेविषयी ते बोलले. ''सृष्टीद्वारे मानव स्वतःचे क्षितिज उंचावू शकतो आणि पुनर्जन्म घेऊ शकतो '' ही कल्पना त्यांनी तिथे मांडली. तेथील त्यांची व्याख्याने पर्सनॅलिटी या पुस्तकात संकलित करून प्रसिद्ध करण्यात आली. त्यांनी हे पुस्तक आपले त्यावेळचे जवळचे मित्र सी एफ अँड्रयुज यांना अर्पण केले.

त्यांच्या इंग्लंड आणि अमेरिकेच्या केलेल्या पुढील दौऱ्यात मात्र त्यांचे व्हावे तसे स्वागत झाले नाही. त्याचे एक कारण म्हणजे इंग्रजांनी जालियनवाला बाग येथे केलेल्या निष्पाप लोकांच्या हत्याकांडाच्या निषेधार्थ रवींद्रनाथांनी आपली सर ही पदवी परत केली होती. ब्रिटिश लोक साधारणपणे स्वभावाने अतिथ्यशील असतात. परंतु जिथे त्यांच्या राष्ट्रीयत्वाच्या भावनेशी विपरीत असलेली कोणतीही गोष्ट घडते, तेव्हा मात्र ते तितक्याच अलिप्ततेच्या भावनेने वागतात हा अनुभव त्यांना इंग्लंडमध्ये आला. त्यांच्या या प्रवासादरम्यान इंग्लंड आणि अमेरिकेत झालेली औद्योगिक क्रांती त्यांनी पाहिली. प्रचंड यंत्रे आणि त्यातून मोठ्या प्रमाणावर निर्माण होणाऱ्या वस्तूंनी मानवी जीवनावर आक्रमण केले आहे हे त्यांच्या लक्षात आले. काही गोष्टींची माणसाला गरज नसतानाही केवळ मुबलक निर्माण होणाऱ्या वस्तूंच्या उपभोगासाठी कृत्रिम गरजा निर्माण केल्या जात आहेत असे त्यांना जाणवले. अतिरिक्त तांत्रिक आणि यांत्रिक विकासामुळे मानवाभोवती एक कवच निर्माण होऊन तो नैसर्गिक गोष्टींपासून दूर जाईल अशी भीती त्यांना वाटू लागली. मानव यंत्राद्वारे संपत्ती निर्माण करतो आहे पण आध्यात्मिक मूल्यांचा त्याग करून त्यासाठी मोठी किंमत तो मोजतो आहे. मानवाने स्वतःभोवती निर्माण केलेला पिंजरा जरी सुवर्णाचा असला तरी तो बाहेरच्या जगाचा संबंध तोडून टाकतो.

आपले हे विचार स्पष्ट करण्यासाठी त्यांनी घरटे आणि पिंजरा यांचे रूपक वापरतात. ते म्हणतात, '' पाखराला घरट्याची गरज असते ती निवाऱ्याचे स्थान म्हणून. त्यामुळे त्याला भराऱ्या मारण्यासाठी अटकाव होत नाही. परंतु जेव्हा तो पिंजऱ्यात असतो तेव्हा त्याला राहण्यासाठी उत्तम निवारा मिळतो. पण तो आकाशात भरारी मारण्याचे त्याचे स्वातंत्र्य गमावून बसतो. तांत्रिक ज्ञान हे काही मर्यादिपर्यंतच आर्थिक सुरक्षितता आणि आराम देऊ शकते. परंतु दुसऱ्या बाजूने जर तंत्रज्ञानाचा विकास असाच अनंत काळापर्यंत सुरू राहिला तर वस्तुस्थिती अशी होते की मानव स्वतःच्या गरजा गुणकाने वाढवून घेऊन स्वतःलाच त्या पिंजऱ्यात बंद करून घेतो. रवींद्रनाथांचे हे विचार आजही कालवाह्य झालेले नाहीत किंबहुना आज त्यावर विचार करण्याची अधिक आवश्यकता आहे. **(क्रमशः)**

## डॉ. सुरेश सिरसीकर आणि डॉ. अपर्णा मेहता राजर्षी शाहू राष्ट्रीय सन्मान पुरस्काराने सन्मानित

ज्योतिर्मय साहित्य

मानवतावादी सांस्कृतिक चळवळ व दीक्षा चॅरिटेबल ट्रस्ट, कोल्हापूरच्या वतीने लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांना आदर्श मानून विविध जनसवेच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या छत्रपती संभाजीनगरचे होल्डिंग हॅन्ड्सचे संस्थापक अध्यक्ष डॉ सुरेश सिरसीकर व होल्डिंग हॅन्ड्सच्या सचिव डॉ. अपर्णा मेहता यांना राजर्षी शाहू स्मारक भवन, कोल्हापुर येथे राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भरत रसाळे, प्रकाशक व दिग्दर्शक अनिल म्हमाने, प्रा. किसनराव कुराडे, डॉ. सोमनाथ कदम, भरत लाटकर, डॉ. श्रीपाद देसाई, डॉ. शोभा चाळके, संस्थेच्या अध्यक्षा अंतिमा कोल्हापूरकर या मान्यवरांच्या हस्ते राजर्षी शाहू राष्ट्रीय सन्मान पुरस्कार – २०२५ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ह्या पुरस्काराचे स्वरूप मानाचा फेटा, सन्मानचिन्ह आणि पुस्तके असे होता.

राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून मानवतावादी सांस्कृतिक चळवळ व दीक्षा चॅरिटेबल ट्रस्ट च्या वतीने लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांना आदर्श मानून विविध जनसवेच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्याना दरवर्षी राजर्षी शाहू राष्ट्रीय सन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात येते.

छत्रपती संभाजी नगरचे डॉ. सुरेश सिरसीकर आणि डॉ अपर्णा मेहता यांना सामाजिक कार्यात विविध आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय सन्मान आणि पुरस्कार मिळालेली आहे. डॉ. सुरेश सिरसीकर आणि डॉ अपर्णा मेहता यांची होल्डिंग हॅन्ड्स ही संस्था आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय पातळीवर काम करते. ही संस्था आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, सांस्कृतिक, महिला सबलीकरण तसेच सामाजिक बांधिलकी असलेले सर्व उपक्रम राबवित असते.

ही संस्था राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आणि महिला सक्षमीकरणावर काम करत आहे. पुण्यात एक महिला प्रशिक्षण आणि रोजगार केंद्र आहे, ज्यामध्ये अनेक महिलांना प्रशिक्षण आणि रोजगार मिळाला आहे.



कोल्हापूर, सांगली पूरग्रस्त आणि कोविड-१९ मध्ये संस्थेने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. कोविड-१९ मध्ये घाबरलेल्या लोकांसाठी देशभरात मोफत टेलिफोनिक समुपदेशन हेल्पलाइन सुरू केली होती आणि अनेकांना अन्नधान्य आणि इतर मदत पुरवली होती. सध्या थायलंडमध्ये आंतरराष्ट्रीय शिष्यवृत्ती स्पर्धा आयोजित केली जात आहे, ज्यामध्ये सात देश सहभागी आहेत. थायलंडमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पहिल्या पुतळ्याच्या अनावरण होल्डिंग हॅन्ड्स च्या उपस्थित झाले होते. जपानच्या टोकियो येथील हॅपी सायन्स युनिव्हर्सिटीकडून डॉ. सुरेश सिरसीकर आणि डॉ अपर्णा मेहता यांना स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. थायलंडमध्ये बाबासाहेबांच्या पहिल्या पुतळ्याच्या अनावरणात डॉ. सुरेश सिरसीकर यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले होते. श्रीलंकेचे तत्कालीन पंतप्रधान दिनेश गुणवर्धने यांनी डॉ. सुरेश सिरसीकर आणि डॉ अपर्णा मेहता यांचे स्वागत केले. अनुराधापुरा येथे पंचशील ध्वज समारंभात श्रीलंकेचे सामाजिक न्याय मंत्री विजयदास राजपक्षे यांनी डॉ .सुरेश सिरसीकर आणि डॉ अपर्णा मेहता यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले. संयुक्त राष्ट्रांच्या वेसाक उत्सव परिषदेत हो ची मिन्ह सिटी व्हिएतनाम – २०२५ मध्ये डॉ . सुरेश सिरसीकर आणि डॉ अपर्णा मेहता यांना स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. वॉशिंग्टन येथे मुख्यालय असलेल्या ग्लोबल ह्यूमन राईट्स ट्रस्टच्या जम्मू आणि काश्मीर शाखेने मानद डॉक्टरेट पदवी प्रदान केली. याबरोबरच , समाज भूषण पुरस्कार २०२४- तितिक्षा इंटरनॅशनल, पुणे, समाज भूषण पुरस्कार- (२०२२) तेजस फाउंडेशन, नाशिक, कर्करोग मुक्त महाराष्ट्र पुरस्कार (२०२२) आरोग्य जागृती असोसिएट, औरंगाबाद, समाज प्रबोधन चॅरिटेबल ट्रस्ट अँड वुमेन्स लिबर्टी, पुणे तर्फे पुरस्कार (२०२३), सेवापथ सोशल फाउंडेशन, औरंगाबाद तर्फे आदर्श सेवा गौरव पुरस्कार (२०२३), नारी शक्ती पुरस्कार, तेजस फाउंडेशन २०२२, नाशिक, कला गौरव पुरस्कार (२०११) – काव्या मित्रा, पुणे इ. अनेक पुरस्कारांनी डॉ. सुरेश सिरसीकर आणि डॉ अपर्णा मेहता सन्मानित आहेत. डॉ. सुरेश सिरसीकर हे चित्रपटक्षेत्राशी संबंधित असून अनेक चित्रपट आणि मालिका मध्ये दिग्दर्शक आणि सहायक दिग्दर्शक म्हणून काम पाहिलं आहे. ते चित्रपट निर्मातेही असून चित्रपट आणि मालिका निर्मिती केली आहे. ते स्तंभ लेखक असून अनेक वृत्तपत्र आणि मासिकांमध्ये त्यांचे लेख आलेले आहेत. पुण्याच्या ''शब्दशिल्प'' त्रैमासिकाचे संपादक ही आहेत.

***

## बॅडमिंटन स्पर्धेत ज्येष्ठ गटात राजेंद्र केडगे व रामभिरसिंग राठोड प्रथम

ज्योतिर्मय साहित्य

**रावेत, पुणे –** रावेत येथील आर डी एक्स बॅडमिंटन ग्रुपतर्फे एलियन्स बॅडमिंटन कोर्ट येथे नुकत्याच बॅडमिंटन स्पर्धा भरविण्यात आल्या होत्या. पुरूष दुहेरी, मिश्र दुहेरी व ४० वय वर्षे वरील गट अशा तीन प्रकारात ह्या स्पर्धा घेण्यात आल्या. ४० वय वर्षे गटात अटीतटीच्या अंतिम सामन्यात राजेंद्र केडगे व रामभिरसिंग राठोड यांनी सचिन पवळे व अंशुमन मोहोपात्रा यांचा पराभव करीत प्रथम क्रमांक पटकावला. तर पुरूष दुहेरी गटात ओम कोलते व आनंद चोपडे यांनी सदानंद वाघ व आकाश केसरकर यांच्यावर मात करीत प्रथम क्रमांक पटकावला. तसेच मिश्र दुहेरी स्पर्धेत श्लोक सहस्रबुध्दे व आराध्या जोशी या अनुक्रमे १३ व १२ वर्षांच्या युवा स्पर्धकांनी धरम वीर व बिन्सी यांचा



पराभव करीत विजय संपादन केला.

आजच्या पिढीमध्ये शारीरीक तंदुरूस्ती बरोबरच मानसिक ताणतणाव कमी व्हावा म्हणून श्री राहुल ढेकणे यांच्या पुढाकारातून आरडीएक्स ग्रुपची स्थापना झाली. अल्पावधीतच १०० सदस्यांच्या टप्पा गाठलेल्या या ग्रुपने खुली बॅडमिंटन स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेला प्रेक्षकांचा व खेळाडूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आपल्या व्यवसायामुळे असेल की आय टी क्षेत्रात काम करीत असल्यामुळे असेल स्थूलतेचे प्रमाण वाढलेले आहेच परंतु आजच्या स्पर्धात्मक जगात टिकून राहण्याचा व यशस्वी होण्यासाठीचा मानसिक ताणही मर्यादिपलिकडे गेला आहे आणि त्यासाठी शारीरीक तंदुरूस्ती बरोबरच मानसिक ताण कमी करण्यासाठी बॅडमिंटन खेळण्याचा फार चांगला परीणाम जाणवत असल्याचे या स्पर्धेत सहभागी खेळाडूंचे तसेच आरडीएक्स ग्रुपमधील सदस्यांनी आवर्जून सांगितले.

या स्पर्धेचे प्रायोजक सर्वोच्च न्यायालय, दिल्ली व मुंबई उच्च न्यायालयात वकीली करणारे एडवोकेट राजेंद्र केडगे यांनी फक्त स्पर्धा प्रायोजितच केली नाही तर स्वतः प्रत्यक्ष स्पर्धात्मक सहभाग नोंदवून प्रथम क्रमांकाचे यशही संपादन केले. आरडीएक्स ग्रुपचे संस्थापक राहुल ढेकणे यांना या स्पर्धांच्या संयोजनामध्ये सदानंद वाघ, धरम वीर, ऋषिकेश सहस्त्रबुद्धे, निहाल मुन्शी, ओम कोलते, शीतल भोसले, मेघना गावंडे, अनुष्का शाळू, प्रियांका नायर, सचिन पवळे यांनी सहकार्य केले व स्पर्धा यशस्वी झाल्याचा आनंदही त्यांच्या बोलण्यातून जाणवत होता.

## वाढदिवसानिमित्त ज्येष्ठांना पुस्तकांची भेट

ज्योतिर्मय साहित्य

पिंपळे सौदागर – वाचन संस्कृतीचा प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने येथील उन्नती सोशल फाउंडेशनतर्फे ज्येष्ठ नागरिकांना वाढदिवसानिमित्त पुस्तके भेट देण्यात आली. ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात पिंपरी चिंचवड मधील युवा उद्योजक विवेक भिसे यांच्याहस्ते पंचवीस ज्येष्ठांना पुस्तक आणि नॅपकीन भेट स्वरुपात देण्यात आले. सोमवार दि. ३० जून रोजी सायंकाळी पीसीएमसी मैदानावर डॉ. सुभाष पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात उद्योजक विवेक भिसे यांच्यासह कुंदन झिंजुर्डे, सखाराम ढाकणे, शोभा राजगुरे, निर्मला कासार आणि शकुंतला शिंदे यांची





व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर अशोक येळंमकर, रवींद्र संदानशिवे, सुरेखा पाटील, सुरेंद्र पागेदार , रेखा येळंमकर आदींनी विविध गाणी , कविता सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि संचलन शकुंतला शिंदे यांनी केले. सखाराम ढाकणे यांनी आभार मानले. भामिनी महाले यांनी राष्ट्रगीत सादर करुन कार्यक्रमाची सांगता केली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विवेकानंद लिगाडे, रमेश वाणी, अनिलकुमार शाह, रमेश लांडगे, सुभाष पाटील, जयपाल सिदनाळे आदिंची परिश्रम घेतले.



इंदापूरी निखारे

## विद्यापीठात संस्कृत साठी शून्य प्रवेश !



ज्योतिर्मय साहित्य

दारावरील बेल वाजली आणि सकाळीच कोण आले? असे थोबाडावर प्रश्नचिन्ह घेऊन दार उघडले तर समोर विद्यापीठातील संस्कृत विषयाचे विभाग प्रमुख! कॉलनीतच रहात असल्यामुळे ओळखीचे. प्रश्नचिन्ह गायब झाले आणि आदराने सर या ना असे प्रचंड आदराने त्यांचे स्वागत केले. वडिलांना सांगितले सर आले आहेत. मग चहा बिस्कीट आणि वडिलांबरोबर काही गप्पा सुरु झाल्या. तुम्ही बसा सर, मी ऑफिसला जाण्याची तयारी करतो. आज हियारिंग आहे त्यामुळे मला वेळेवर जावे लागेल. सर म्हणाले ह ह साहेब आपण जा, मला तुमच्या मुलाकडे काम आहे...

वडिलांनी मुलाला हाक मारली आणि सरांना काही बोलायचे आहे तुझ्याबरोबर...

तो आला! सरांना नमस्कार केला आणि विचारले सर काय काम आहे? तुम्ही सांगा मी करतो. मग सर बोलायला लागले...

तुला माहित आहे ना! संस्कृत विषय किती महत्वाचा आहे. पण विद्यार्थ्यांचे खूप दुर्लक्ष आहे आणि हे आपल्या संस्कृतीसाठी फार धोकादायक आहे. एक काम करावे असे वाटते! तू दोन मित्र तयार कर कमीतकमी संस्कृत विषयासाठी. नाहीतर संस्कृत विषय विभाग बंद होईल विद्यापीठातून... तो बी.एस्सीचा अभ्यास करणारा! ह म्हणाला सरांना... त्याच्या एका मित्राच्या बहिणीला संस्कृत विषयासाठी तयार केले. सरांकडे घेऊन गेला आणि सांगितले. सर एकदम खूष झाले. आम्हाला चहा घेऊन आले, म्हणाले दोन विद्यार्थी मिळाले त्यामुळे संस्कृत विषय विभाग सुरु राहिले...

त्याने मित्राच्या बहिणीला, आईवडिलांना सांगितले की संस्कृत मध्ये एम.ए. कर. विद्यापीठात पहिली येईल याची खात्री देऊन टाकली होती... शिक्षण क्षेत्रात हे त्याने केलेले बहुमूल्य योगदान आज वरील बातमी वाचताना आठवण आली... वरील बातमीवरून लक्षात येईल शिक्षण क्षेत्रात योगदान देण्यासाठी खूप स्कोप आहे...









# क्रांतीकारकांत श्रेष्ठ योग्यतेचे संघटक – राजेंद्रनाथ लाहिरी

**ज्योतिर्मय साहित्य**

असोसिएशनच्या नेत्यांना यावेळी एका जहाजांवरून गुप्त मार्गाने बराच शस्त्रसंग्रह मिळण्यासारखा होता. पण यासाठी कित्येक सहस्त्र रुपयांची जरूरी होती. प्रथम राजेंद्र लाहिरी यांसह पदाधिकाऱ्यांनी आपल्या घरातून जेवढा पैसा उपलब्ध करता येईल तेवढा केला. पण साऱ्याच निष्कांचनांजवळ निघणार काय विशेष? अशा कामाविषयी सहानुभूती असणाऱ्या लोकांकडून निधी गोळा करण्याचाही प्रयत्न झाला. पण त्याला फारसे यश आले नाही. शेवटची शस्त्रे खरेदी करण्याची संधी जाऊ नये म्हणून रायबरेली जिल्ह्यातील सराय महेश नावाच्या गांवात राजनैतिक दरवडाही घालण्यात आला. तरीही नड भागली नाही. पैशाच्या उपलब्धतेसाठी पं. रामप्रसाद बिस्मिल यांनी सरकारी पोस्ट ऑफिसच्या रेल्वेतून नेण्यात येणारा खजिना काकोरी स्टेशनजवळ साखळी ओढून लुटण्याचा ठराव समितीपुढे मांडला. सरकारी पैशाच्या पिशव्या पळविण्यासाठी पं. रामप्रसाद बिस्मिल, अशफाक उल्ला खान, राजेंद्र लाहिरी, शचीन्द्रनाथ बक्षी, मुकुंदीलाल, मन्मथनाथ गुप्त, मुरारी शर्मा, बनवारीलाल व चंद्रशेखर आझाद यांनी जबाबदारी स्वीकारली. ९ ऑगस्ट १९२५ रोजी काकोरी ट्रेन मध्ये बसून हा खजिना लुटण्यात आला. राजेद्र लाहिरी यांनी साखळी ओढून गाडी थांबवली. याप्रसंगी एका पॅसेंजरची तो पळून जात असताना गोळी मारून हत्या करण्यात आली. मन्मथनाय गुप्त याच्याकडून अनवधानाने गोळी झाडली गेली. केवळ दहा मिनीटात तिजोरी फोडून पैसे पिशव्यात भरून क्रांतीकारक शेजारच्या दाट झाडीत अंतर्धान पावले. सावधपणे लखनौ शहरात क्रांतीकारकांनी या दरवड्यात मिळालेल्या पाच सहस्त्र रूपयांसह प्रवेश केला. या पैशाचा उपयोग क्रांतीकारकांना शस्त्रसंग्रह करण्यासाठी झाला. ब्रिटीश शासन हादरले. भारतभर या साहसी दरवड्याची चर्चा होऊन क्रांतीकारकांचा जयजयकार करण्यात आला. स्वातंत्र्य लढ्यासाठी तरुणांची वेगवेगळ्या ठिकाणी हिंदुस्थानभर एकी होऊन लढा तीव्र होण्यास वेग आला. ब्रिटीश शासनाला चकवा देण्यासाठी या घटनेतील सर्व क्रांतीकारक वेगवेगळ्या ठिकाणी गुप्त झाले.

पं. रामप्रसाद बिस्मिल यांनी राजेंद्र लाहिरी यांना बॉम्ब बनविण्यासाठी हे शिकण्यासाठी कलकत्ता येथे पाठविले. १९२५ मध्ये कलकत्ता जवळील दक्षिणेश्वर येथे हा बॉम्बचा कारखाना होता. इथे बॉम्ब बनविण्याची तयारी चालू असतानाच एका सदस्याच्या निष्काळजीपणामुळे एक



बॉम्ब फुटला आणि मोठा आवाज निर्माण झाल्याने पोलिस त्या ठिकाणी पोहोचले. राजेंद्र लाहिरी यांसह अनेक तरुणांना पकडण्यात आले. राजेंद्र लाहिरी यांना या खटल्यात १० वर्षाची शिक्षा झाली. अपील केल्यामुळे ती ५ वर्षे करण्यात आली. याच काळात काकोरी रेल्वे दरोडा कट प्रकरणाने ब्रिटीश राजसत्तेला जणू गदागदा हलवून जागे केल्याने दमनचक्रे अतिशय वेगाने फिरून एकंदर चाळीस व्यक्तींना पकडण्यात आले. आरोपीपैकी चंद्रशेखर आझाद शेवटपर्यंत सापडले नाहीत. या अटकेनंतर राजेंद्र लाहिरी यांचा या कटामध्ये समावेश होता हे लक्षात आल्याने त्यांनाही या प्रकरणात गोवण्यात आले. अटक झालेल्या पैकी कोणीही स्वार्थी नसल्याचे सर्वांना माहित असल्याने या सर्वांबद्दल सामान्य जनतेच्या मनात या साहसी व शूर देशभक्त यांच्याविषयी उत्कट आत्मीयता होती. स्वयंस्फूर्त श्रध्देने निधी जमवून त्यांच्या संरक्षणाची व्यवस्था लोकांनी केली. या सर्वांच्या बाजूने कोर्टात पं. गोविंदवल्लभ पंत, बी.के. चौधरी, मोहनलाल सक्सेना, व चंद्रभान गुप्त हे गुप्तपणे काम चालवीत होते. बरेच दिवस खटला चालून ७ एप्रिल १९२५ रोजी या खटल्याचा निर्णय होऊन चारजणांना फाशी देत बाकीच्यांना इतर शिक्षा सुनावण्यात आली. राजेंद्र लाहिरी आणि इतर तिघांच्या फाशीने स्वातंत्र्यलढा शमण्याऐवजी तीव्र झाला. वयाच्या २६ व्या वर्षी फाशी होऊनही त्यांचे विचार आणि स्वातंत्र्याची भावना तरुणांना स्फूर्तीदायी ठरली. शेवटपर्यंत राजेंद्र लाहिरी कैदेमध्ये व्यायाम करीत तसेच पूजापाठ पण करीत. जेलर त्यांना असे म्हणाले कि, पूजापाठ ठीक आहे पण व्यायाम कशाला? तुम्हाला तर फाशी होणार आहे. त्यावर राजेंद्र लाहिरी म्हणाले मला दुसरा जन्म मिळताना चांगले तगडे शरीर मिळावे म्हणून मी कसरत करतो, ज्यायोगे तुमच्या सत्तेविरुद्ध पुन्हा मला लढता येईल. उत्तरप्रदेशच्या गोंडा जिल्ह्यामध्ये प्रत्येक वर्षी १७ डिसेंबरला शासकीय तसेच सामाजिक कार्यक्रम केले जाऊन स्वातंत्र्य सेनानी राजेंद्र लाहिरी यांच्या स्मृती जपल्या जातात. हा दिवस लाहिरी दिवस म्हणून साजरा केला जातो. राजेंद्रनाथ लाहिरी हे एक तेजस्वी, लक्षवेधी आणि बुद्धीमान क्रांतीकारक होते. ज्यांनी काकोरी कटाच्या माध्यमातून तरुणांना देशस्वातंत्र्यासाठी प्रोत्साहित केले. तत्वनिष्ठ असणाऱ्या या क्रांतीकारकाचे स्मरण आजही देशभर होते.




# पुण्यात आदिवासी साहित्य संमेलन

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे–** आदिवासी साहित्य आणि संस्कृती संवर्धन संस्था, बल्लारपूर, जिल्हा चंद्रपूर आणि विदिशा विचार मंच, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आठवे आदिवासी उलगुलानवेध साहित्य संमेलन सोमवार दिनांक ७ जुलै २०२५ रोजी आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ लेखक, समीक्षक आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती विदिशा विचार मंचच्या संस्थापक-संचालक ममता क्षेमकल्याणी यांनी दिली आहे.

सोमवार दिनांक ७ जुलै २०२५ रोजी माधवराव पटवर्धन सभागृह, महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रस्ता, पुणे येथे आयोजित या संमेलनानिमित्त प्रवेशव्दारापासून सकाळी ८.३० वाजता ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. या संमेलनाचे स्वागताध्यक्ष कोहिनूर ग्रुप, पुणेचे चेअरमन आणि कार्यकारी संचालक कृष्णकुमार गोयल असून संमेलनाचे उद्घाटन सकाळी १०.३० वाजता अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, पुणेचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणेचे कार्याध्यक्ष प्रा.मिलिंद जोशी यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, पुणेच्या कार्यवाह आणि महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणेच्या प्रमुख कार्यवाह सुनीताराजे पवार, बल्लारपूर, जि. चंद्रपूर येथील आदिवासी साहित्य आणि संस्कृती संवर्धन संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. विनायक तुमराम आणि पुणे येथे झालेल्या आदिवासी उलगुलानवेध साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष प्रसिद्ध लेखक विश्वास वसेकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. उद्घाटन सोहळ्यानंतर दुपारी १२.३० वाजता प्रा. विश्वास वसेकर, लातूर येथील आदिवासी साहित्याचे अभ्यासक रामराजे अत्राम आणि नागपूर येथील आदिवासी साहित्याचे अभ्यासक आणि संशोधक प्रा. तुलसीदास भोयर हे आदिवासी साहित्याचे अभिवाचन करणार आहेत. यानंतर दुपारी ३.०० वाजता मराठी साहित्य विश्वाच्या पटलावर आदिवासी साहित्य व साहित्यिकांचे योगदान या विषयावर परिसंवाद होणार आहे.

# डॉ. शेषराव पठाडेंच्या शाहिरीला दर्दी पुणेकरांकडून प्रतिसाद !

## अवीट मैफली मध्ये लोकगीतांचे सादरीकरण

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** गारखेडा परिसरातील हॉटेल राधेमध्ये अवीट मैफलीत शाहीर डॉ. शेषराव पठाडे यांनी खरोखर अवीट लोकगीत-लावणीचे सादर करून ज्येष्ठ -श्रेष्ठ गायकांसह उपस्थित रसिकांची मने जिंकली. लोकारूचीच्या लोकगीतांना पुण्यातील कलावंतांकडून भरभरून प्रतिसाद मिळाला. पुण्याच्या अवीट सांगितिक ग्रुपतर्फे रविवार, २९ रोजी या आगळ्या-वेगळ्या मैफलचे आयोजन करण्यात आले होते.

मुख्य म्हणजे सोशल मीडियावरून गायक कलावंतांचा मेळा जमला आणि पुणे आणि जालन्याचे गायक, वादक कलावंत ऐतिहासिक अशा छत्रपती संभाजीनगरमध्ये एकत्र आले, हे विशेष. व्हॉटस् ॲप आणि फेसबुकवरून आम्ही सर्व परस्परांशी जोडले गेलो आणि सांगितीक अवीट मैफलीतून एकत्र आलो, असे या ग्रुपचे प्रमुख ८२ वर्षांचे विठ्ठल वैद्य, डॉ. अनिल कुलकर्णी आणि सहआयोजक व प्रसिद्ध निवेदिका दीपाली कुलकर्णी यांनी सांगितले.

ज्येष्ठ-श्रेष्ठ गायक कलावंतांनी हिंदी-मराठी चित्रपटातील सदाबहार गाणी सादर करून मैफलीत रंग भरले. या मैफलीत छत्रपती संभाजीनगरसह पुणे



आणि जालना शहरातील गायकांनी आपली कला प्रदर्शित केली. महानगरांमधील गायक आणि संगीतप्रेमीजनांना एकत्र येता यावे, या उद्देशाने गायन मैफलीचे आयोजन करण्यात आले होते.

पुण्याचे जेष्ठ गायक आणि आयोजक विठ्ठल वैद्य यांच्या सरस्वती वंदनेने मैफलीस सुरुवात झाली. आषाढीनिमित्त पंढरीच्या दिशेने अनेक वारकरी दिंडी घेऊन जात आहेत, या पार्श्वभूमीवर कानडा राजा पंढरीचा हा अभंग ॲड. गौरांग कुलकर्णी यांनी सादर करून टाळ-मृदंगाच्या गजरात सभागृह दणाणून गेले.

मैफलीत नव्या जुन्या हिंदी, मराठी गाण्यांची रेलचेल होती. मंजिले अपनी जगह है.. हे गीत जालन्याचे जेईएस कॉलेजचे प्राचार्य डॉ. गणेश कुलकर्णी यांनी सादर केले. ये शाम मस्तानी, ये समा समा है ये प्यार का ,दिल हुं हुं करे , रिमझिम गिरे सावन, तेरे नैना सावन भादो , तुम्हे याद होगा, कितने भी तू कर ले सितम आदी एकाहून एक सरस अशी गाणी मैफलीत सादर झाली.

डॉ. पठाडे यांना दाद

जालन्याचे डॉ. विजय गजेंद्रगडकर यांनी हर्मो निकावर (माउथ ऑर्गन) लाखो है निगाहो.. मे गीत अप्रतिम सादर केले, तर डॉ. शेषराव पठाडे यांनी आधी गणाला रणी आणा हो...हा शाहीर पठ्ठे बापुराव कुलकर्णी यांचा गण आणि गुरू लोककवी वामनदादा कर्डक यांचे हसावी गादी बाराच्या आधी भांडण मिटवावं। प्रितीच्या फुला तरी तू मला वेळेला उठवावं... हे पती-पत्नीतील प्रेमाचा संदेश देणारे लोकप्रिय लोकगीत सादर करून रसिकांची मने जिंकली. जुन्या जाणत्या गायक कलावंतांनी देखील लोकगीतांना भरभरून प्रतिसाद देत डोक्यावर घेतले.

डॉ. अंजली कुलकर्णी व डॉ. अनिल कुलकर्णी यांनी वो जब याद आए सादर केले. डॉ. नितिशा यांच्या दिल है छोटासा या गीताला सगळ्यांनीच साथसंगत केली.

कभी अलविदा.. ने सांगता

कभी अलविदा ना कहना... या गीताने सदाबहार मैफलची यशस्वी सांगता झाली. अवीट सांगितीक मैफल यशस्वी करण्यासाठी डॉ. अनिल कुलकर्णी व विठ्ठल वैद्य अथक परिश्रम घेतले. ८२ वर्षांचे विठ्ठल वैद्य यांनी सगळ्या उपस्थितांना उत्स्फूर्तपणे नाचायला लावून मैफलमध्ये बहार आणली. सहआयोजक नितीन रणदिवे यांनी ध्वनी व्यवस्था सांभाळत बहुतांश कलावंतांना साथ देत गीतानुरूप नृत्य करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. दीपाली कुलकर्णी यांच्या निवेदनाने मैफल रंगतदार झाली.


# Fall coulers (पानगळ..आणि पानांचे बदलते रंग)

इकडे नवरात्रीची सुरुवात झाली आणि हवेत गारठा वाढू लागला. बाहेर खूप प्रमाणात थंडी वाढू लागली की इथले सरकार घरी असलेल्या झरोक्यातून गरम हवा सोडते... त्यामुळे घर उबदार छान राहते आणि बाहेरच्या तापमानाचा अंदाज येत नाही.. बाहेर फिरायला गेले की अधून मधून गार वाऱ्याचे झोत वाढू लागले आणि त्याच बरोबर सगळीकडे फॉल (पानगळ) ची चर्चा ही वाढू लागली. फोन, एकत्र भेटी किंवा सोशल मीडियावर(इकडच्या) पानांचे रंग आणि पानगळ किती बदलली आहे किती वाढली आहे कुठे आणि कधी कधी जायचे याच्याबद्दल बोलले, बघितले जाऊ लागले.. मला पहील्यांदा खूप आश्चर्य वाटले. पानांचे रंग ते किती असणार आणि पानगळ यात काय येवढे बघण्यासारखे आणि कौतुकाचे असते?



थंडीमुळे जरी बाहेर फिरायला माझे एकटी एकटीने कमी झाले तरी बंद झाले नव्हते. मी रोज फिरायला ज्या झऱ्या काठी जात होते त्याच्या आसपासच्या झाडांच्या पानांचा रंग रोज बदलताना दिसू लागला. आश्चर्य म्हणजे आजचे चित्र उद्या तेच दिसेल याची शास्वती नसायची. रोज वेगळे रूप वेगळी बहार. हा इतक्या वेगाने आणि असा सौंदर्याकडचा प्रवास मी प्रथमच अनुभवत होते.

आणि आम्हां कुटुंबीयांचे एक दिवस फॉल कलर्स बघायला जाणे ठरले. साधारण १२ वाजता आम्ही इथून अर्ध्या तासाच्या अंतरावर असलेले फॉल कलर्स बघायला गेलो.. ऊन असूनही गारठा होता. आमच्या सारखे अनेक लोक गाड्या घेऊन आले होते. आम्हीं पार्क करून चालायला




सुरुवात केली. दोन्हीं बाजूला झाडा पानांची अद्भुत रंगपंचमी आणि छोट्या छोट्या लांबवर गेलेल्या पायवाटा. नजरेत किती सामावून घेऊ असे वाटू लागले. मी आज पर्यंतच्या आयुष्यात अनेक रंगांची फुले बघितली होती. पण पानांमध्ये लाल,तांबूस,लिंबू,हिरवा, पिवळा अशा अनेक छटा कधी बघितल्या नव्हत्या. परत प्रत्येक झाड वेगळे, पानांचा आकार, रंग, बहार, सगळ्यातच अनुपम विविधता होती. मध्ये मध्ये सुंदर झरे वाहत होते. आमच्या सारखेच आलेले सहप्रवासी आनंद घेताना आणि फोटो मध्ये हे सौंदर्य टिपण्याचा प्रयत्न करताना दिसत होते. त्या दिवशी मी अनेक पायवाटांनी जाऊन विविध प्रकारचा सौंदर्यानुभव घेतला. पाय थकले पण मन तृप्त झाले नाही.

नंतर लेकीच्या इमारती पासून अगदी जवळच असलेल्या मीसीसागा व्हॅली इथे फॉल बघायला गेलो. या वेळी झाडा पानांच्या बदलत्या रंगा बरोबरच सुंदर पानगळ बघायला आणि अनुभवायला मिळाली. आज पर्यंत मी फुलांचा गालिचा किंवा पायघड्या बघितल्या होत्या. काही शुभ प्रसंगी त्याचा अनुभव आणि आनंद ही घेतला होता. पण निसर्गाने घातलेल्या इतक्या रंगीत आणि मखमली पायघड्यावरून चालण्याचा अनुभव मात्र पहिलाच होता.

त्यांची अंगावर होणारी सहज पखरण, पाण्यातले तरंगते विलोभनीय रूप किती अनोखे आणि सुंदर होते. या वेळी मला मनापासून वाटले आपले संपणे ही असेच असावे जाता जाता ही सगळ्यांना आनंद आणि तृप्तता देणारे..

# अण्णासाहेब मगर महाविद्यालय व बोपोडी प्रजापिता ब्रह्मकुमारी सेंटर तर्फे डिजिटल वेलनेस प्रशिक्षण

**ज्योतिर्मय साहित्य**

**भोर –** पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब मगर महाविद्यालय, प्रजापिता ब्रह्माकुमारीस आणि राजयोग शिक्षण आणि संशोधन केंद्र बोपोडी यांच्या संयुक्त विद्यमाने ''डिजिटल वेलनेस'' या विषयावर फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. पराग काळकर, महाविद्यालयाचे प्राचार्य व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. नितीन घोरपडे, योग प्रशिक्षक बी. के. बाला किशोर(हैदराबाद उपाध्यक्ष मल्टिनॅशनल कंपनी) उपस्थित होते. या मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उदघाटन झाले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डिजिटल वेलनेसची गरज सांगताना डिजीटल तंत्र वापरताना डोळे, पाठ, मान यावर अतिरिक्त ताण येतो, मन:शांती कमी होते आणि तणाव वाढतो म्हणून ऑनलाईन पेक्षा ऑफलाईन जगाचा आनंद घ्या असे आवाहन केले.



सध्या कामाच्या ठिकाणी वाढत असलेल्या असलेल्या ताणतणावामुळे समाजामध्ये अनेक नकारात्मक गोष्टी घडत आहेत. डिजिटल उपकरणांच्या माध्यमातून नको तो कचरा डोक्यात साठवला जातो तो बाहेर काढण्यासाठी ध्यान धारणेची गरज आहे. ध्यान धारणेच्या माध्यमातून आपण स्वतःचा शोध घेऊन मनाशी संवाद साधू शकतो. म्हणून विद्यार्थ्यांनी आपला मोबाईलचा वेळ कमी करून तो वेळ त्यांनी वाचनालयात घालवला पाहिजे . जगामध्ये इलनेसवर चर्चा होत असताना आपला देश मात्र वेलनेसवर चर्चा करत असतो. ही आपली खूपच सकारात्मक बाजू आहे. असे मत सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी व्यक्त केले.

मोबाईलच्या अतिवापरामुळे कुटुंबातील संवाद कमी होऊ लागला आहे त्यामुळे मुलांमध्ये एक प्रकारची उदासीनता निर्माण होते. म्हणून मोबाईलचा वापर कमी प्रमाणात करावा आठवड्यातून एक दिवस मोबाईलचा उपवास करावा मोबाईल हे साधन आहे साध्य नव्हे हे सर्वांनी लक्षात घ्यावे .असे मत प्रशिक्षक बी. के. बाला किशोर यांनी व्यक्त केले.लक्ष्मी दीदी, आयटी सॉफ्टवेअर इंजिनियर स्वाती दीदी यांनी यांनी 'डिजिटल वेलनेस' या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात पंचावन्न प्राध्यापकांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शर्मिला दिदी यांनी केले तर उपप्राचार्य डॉ.शुभांगी औटी यांनी आभार मानले.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559